# प्राचीन भारतातील लातूरची राष्ट्रीय बाजारपेठ

**प्रा.डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे**
इतिहास विभाग प्रमुख
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर पिन-४१३५१५

**प्रस्तावना :-**

प्राचीन भारतात मराठवाडा राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रात अग्रेसर होता. मराठवाड्यात लातूर ही महत्वपूर्ण बाजारपेठ होती. सातवाहन राजांनी मराठवाड्यातील पैठण येथून ४६० वर्ष राज्य केले. सातवाहन काळात मराठवाड्याचा विविध क्षेत्रात विकास झालेला होता. लातूर हे सातवाहन काळात व्यापाराचे महत्वपूर्ण ठिकाण होते. युरोपीयन व्यापारी गिल्ड प्रमाणे स्वरुप असलेल्या प्राचीन मराठवाड्यातील श्रेणी या संघटनेमुळे व्यापारास चालना मिळाली. लातूर जिल्ह्यास प्राचीन इतिहासाचा महान वारसा लाभलेला आहे. पुराश्मयुग, नवाश्मयुग, ताम्रपाशान युगात लातूर भागात मानवी वस्ती होती. मांजरा नदीच्या व तेरणा नदीच्या खो-यात पुराश्मयुगीन हत्यारे व अवजारे सापडली आहेत. लातूर व तेर या दोन शहरातील अंतर कमी असल्यामुळे लातूर परिसरात पुराश्मयुगीन काळापासून वस्ती होती हे सिद्ध होते. तसेच लातूर शहर प्राचीन काळातील व्यापारी मार्गावर असल्यामुळे ती राष्ट्रीय बाजारपेठ होती याचे अनेक पुरावे मिळतात.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत-

१) प्राचीन भारतातील मराठवाड्यातील लातूर ही राष्ट्रीय बाजारपेठ होती याचा अभ्यास करणे.
२) राष्ट्रीय बाजारपेठ म्हणून लातूरचे महत्व सांगणे
३) राष्ट्रीय व्यापारात लातूरच्या योगदानाची माहिती देणे.

**संशोधनाची गृहितके :**

१) लातूर ही प्राचीन भारतातील मराठवाड्यातील महत्वाचे व्यापारी केंद्र आहे.
२) राष्ट्रीय बाजारपेठ म्हणून लातूरला प्राचीन काळापासून महत्वाचे स्थान आहे.
३) सातवाहन व राष्ट्रकुट काळात लातूर हे महत्वपूर्ण असे राष्ट्रीय बाजारपेठेचे केंद्र आहे.

**संशोधनाची पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनाचा उपयोग करण्यात आलेला आहे. तसेच उपयुक्त अशा संदर्भ ग्रंथांचा वापर करण्यात आलेला आहे.

**प्राचीन भारतातील लातूरचे राष्ट्रीय व्यापारातील महत्व :**

प्राचीन भारतातील लातूरचे राष्ट्रीय व्यापारातील महत्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते-

**१) प्राचीन भारतातील लातूरचे योगदान :**

इ.स. पूर्व पहिल्या शतकापासून भारताबाहेरील राष्ट्रांशी व्यापार सुरु झाल्यामुळे भारतात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांची निर्मिती झाली. त्याच काळात महाराष्ट्रात अनेक बाजारपेठांची निर्मिती झाली. गोदावरी व तिच्या उपनद्यांमुळे प्राचीन मराठवाड्याचा व्यापारी क्षेत्रात विशेष विकास झाला. सिंचनाच्या सुविधांमुळे शेती उत्पादन वाढले व उत्पन्नात वाढ झाल्यामुळे व्यापाराची भरभराट झाली. तसेच मजबूत राजकीय स्थैर्यामुळे या भागातील आर्थिक स्थिती अतिशय मजबूत झाली. तत्कालीन राजांनी कुशल कामगार, कारागीर व कलावंतांना राजाश्रय दिला. सातवाहनांच्या काळात व्यापाराला राजाश्रय मिळाल्यामुळे मराठवाड्यात पैठण, तेर, भोकरदन येथे उद्योगधंद्यांचा विकास झाला.[१]

लातूर जिल्ह्यास प्राचीन इतिहास व संस्कृतीचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. तत्कालीन व्यापारी बाजारपेठ तेर व लातूर यांच्यातील अंतर जवळचे असल्यामुळे लातूरची व्यापारात भरभराट झाली. मौर्य काळापासून हैद्राबादच्या निजामाच्या राजवटीपर्यंत लातूरला भारतीय व्यापारात महत्वाचे स्थान प्राप्त झाले. थोडक्यात लातूर हे पश्चिम भारताचे व्यापारी मार्गावरील महत्वाचे व्यापारी ठिकाण असल्यामुळे लातूरचा राष्ट्रीय बाजारपेठ म्हणून विकास झाला.

**२) लातूरची भौगोलिक स्थिती :**

लातूर हे स्वातंत्र्यानंतर हैद्राबाद राज्यातील बिदर जिल्ह्यातील गाव होते, नंतर लातूरचा समावेश उस्मानाबाद जिल्ह्यात करण्यात आला. लातूर जिल्ह्यातील डॉ.शिवाजीराव पाटील निलंगेकर व इतर नेत्यांच्या प्रयत्नामुळे दि. १६ ऑगस्ट १९८२ रोजी स्वतंत्र अशा लातूर जिल्ह्याची निर्मिती झाली. लातूर

जिल्हा १७° ५२' ते १८° ५०' उत्तर अक्षांश आणि ७६° १८' ते ७९° १२' पूर्व रेखांशामध्ये विस्तारलेला आहे. इ.स. २०११ च्या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्याती लोकसंख्या २४,५५,५४३ आहे.[२]

लातूर जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७१५७ चौ.कि.मी. आहे. औरंगाबाद विभागाच्या क्षेत्रफळापैकी लातूर जिल्ह्याचे क्षेत्रफळ ११.३४% आहे.[३]

हा संपूर्ण जिल्हा बालाघाट डोंगररांगांनी व्यापलेला आहे. समुद्रसपाटीपासून लातूर जिल्हा ५४० ते ६३८ मीटर उंचीवर आहे.[४]

### ३) लातूरचे ऐतिहासिक स्थान :

अश्मयुगीन कालखंडापासून लातूर व आजुबाजूच्या परिसरात जनजीवन बदलत चालले होते. प्राचीन भारतात मौर्य साम्राज्याच्या स्थापनेनंतर त्या घराण्याचा प्रभाव संपूर्ण भारतभर पडला. यामुळेच लातूरसारख्या महाराष्ट्रातील परिसरात मानव जीवनाचा विकास विविध क्षेत्रात चालू होता. तेर येथे झालेल्या उत्खननामुळे मिळालेल्या अवशेषाची माहिती गोळा झाली आहे. लातूर जिल्ह्यातून तेरणा ही महत्वपूर्ण नदी वाहते व पुढे ती कर्नाटकात पदार्पन करते. तेर या बाजारपेठेतून कर्नाटक व आंध्रप्रदेशात जाणारा रस्ता हा लातूर मार्गे पुढे जातो. तावरजा, तेरणा, मांजरा या प्रमुख नद्या लातूर जिल्ह्यातून वाहतात. या नद्यांच्या परिसरात अनेक संस्कृती अस्तीत्वात आलेल्या आहेत व त्यामध्ये लातूरचे स्थान महत्वपूर्ण स्वरुपाचे आहे. तेर ते रोम हा व्यापारी मार्ग लातूर परिसरातूनच गेलेला आहे.[५] त्यामुळे लातूर हे प्राचीन कालखंडापासून महत्वपूर्ण असे राष्ट्रीय बाजारपेठेचे शहर होते हे सिद्ध होते.

### ४) मौर्य व सातवाहनकालीन लातूरची राष्ट्रीय बाजारपेठ :

सातवाहन राजाने दक्षिण भारतात ४६० वर्षे राज्य कारभार केला. सातवाहनांच्या काळात तेर, पैठण व भोकरदन येथे आंतरराष्ट्रीय बाजारपेठांची निर्मिती झाली. इ.स. पूर्व सहाव्या शतकात भारतात एकूण १६ महाजनपदे होती. त्यापैकी अश्मक व मूलक ही महाजनपदे गोदावरीच्या खो-यात होती. या काळात मांजरा नदीच्या परिसरात लातूर वसले होते. तसेच मांजरा नदीवरच बोधन हे महत्वपूर्ण शहर वसलेले होते.

तेर ही सातवाहन काळातील महत्वपूर्ण अशी आंतरराष्ट्रीय बाजारपेठ होती. तेर व सन्नती या व्यापारी शहरांना जोडणारा राजमार्ग लातूर परिसरातून जात होता. सन्नती येथूनच भारताचा रोमशी व्यापार होत असे. म्हणूनच लातूरचा सांस्कृतिक इतिहास हा मौर्य काळापासून प्रारंभ झाला असावा हे स्पष्ट होते. तेरची आंतरराष्ट्रीय व्यापारात ख्याती पसरली होती. लातूर बाजारपेठ सातवाहन राजाच्या प्रभुत्वाखाली असल्याने, तसेच तेर आणि सन्नती मार्ग लातूरहून जात असल्यामुळे लातूर ही मौर्य व सातवाहन काळातील एक राष्ट्रीय बाजारपेठ होती हे सिद्ध होते.[६]

### ५) राष्ट्रकुटकालीन लातूरची राष्ट्रीय बाजारपेठ व महत्व :

ए. एस. आळतेकर यांच्या मते - राष्ट्रकुट हे कर्नाटकातील असून त्यांची मातृभाषा कानडी होती. यासाठी त्यांनी राष्ट्रकुटांच्या कानडी भाषेतील शीलालेखांचा अभ्यास केला. म्हणूनच राष्ट्रकुट राजा दंतिदुर्ग हा राष्ट्रकुट घराण्याचा संस्थापक असून त्याचे मुळ गाव लातूर आहे हे सिद्ध झाले आहे.[७]

राष्ट्रकुटांचे मुळ वस्तीस्थान आधुनिक लातूर म्हणजेच प्राचीन 'लत्तलुरपूर' हे होते. यासाठी महत्वपूर्ण पुरावा म्हणजे अमोघवर्ष पहिला या राष्ट्रकुट सम्राटाने स्वतःला 'लत्तलुरपूरवराधीश्वर' हे बिरुद धारण केले होते. निलगुंद व शिरुर ताम्रपटात अमोघवर्षानी स्वतःला 'लत्तलुरपूरवराधीश्वर' हे बिरुद लावून घेतलेले आढळते. डॉ. सोमनाथ रोडे, डॉ. पी. व्ही. काटे, डॉ. डी. एन. नगराळे व डॉ. अनिल कठारे या प्रसिद्ध इतिहास तज्ञांनीही राष्ट्रकुट हे लातूरचे आहे हे मान्य केले आहे.[८] कंधारच्या शिलालेखात राष्ट्रकुटांचा उल्लेख यदुवंशीय असाच केलेला आहे. यावरुन राष्ट्रकुट घराणे यदुवंशीय होते असे समजण्यास हरकत नाही. याच बरोबर लातूर महात्म्यानुसार लातूरचे मुळ नाव रत्नापूर होते.[९] असे बरेच संशोधन आधुनिक काळातील इतिहास तज्ञांनी केलेले आहे.

यावरुन आपणास निष्कर्ष काढता येतो की, राष्ट्रकुटांची मुळ भूमी आधुनिक लातूर असून तेथूनच त्यांनी आपल्या राजसत्तेचा विस्तार केला. मराठवाड्यातील लातूर, वेरुळ, कंधार, धारुर, धर्मापूरी या राष्ट्रकुटांच्या प्रारंभिक राजधान्या होत्या तर अंबाजोगाई, तेर, परळी, पैठण ही राष्ट्रकुट राजांच्या काळातील महत्वाची नागरी केंद्रे होती.[१०] चालुक्य राजांच्या काळातसुद्धा लातूर एक भव्यदिव्य नगर म्हणून उदयास आले, हे तिसरा सोमेश्वर याच्या लातूर शिलालेखातून समजते. याच काळात लातूर येथे अनेक मंदिरे, पाठशाळा व जलाशयांची निर्मिती करण्यात आली. याची सविस्तर माहिती गणेशवाडी येथे उपलब्ध झालेल्या इ.स. १०९९ च्या शिलालेखातून मिळते. कल्याणीच्या चालुक्य राजवटीनंतर लातूर परिसर हा देवगिरीच्या यादवांच्या राज्यात समाविष्ट झाला.[११]

अशा प्रकारे देवगिरीच्या यादवांच्या सत्तेनंतर दिल्लीच्या खिलजी घराण्याने मराठवाड्यात सत्ता काबीज केली व लातूर परिसर दिल्ली सुलतानशाहीचा एक भाग बनला. म्हणूनच मौर्य कालखंडापासून ते हैद्राबादच्या निजामाच्या कालखंडापर्यंत लातूर शहर व परिसर व्यापारी व राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्वाचा होता. लातूर शहर प्राचीन व्यापारी मार्गावर वसलेले असल्यामुळे प्राचीन काळापासून ते आधुनिक कालखंडापर्यंत राष्ट्रीय बाजारपेठ म्हणून उभी आहे. आज सुद्धा लातूरमध्ये आधुनिक अशी गंजगोलाईची मार्केट पहावयास मिळते. लातूर येथे रेल्वे स्टेशन असल्यामुळे संपूर्ण देशाशी व्यापार होतो. लातूर प्राचीन काळापासून राष्ट्रीय

*बाजारपेठ म्हणून नावलौकिक प्राप्त शहर आहे. राष्ट्रकुटांची लातूर ही पहिली राजधानी असल्यामुळे राष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून येथे प्रचंड प्रमाणात आर्थिक उलाढाल झाली व एक राष्ट्रीय बाजारपेठ म्हणून लातूरचा नावलौकिक झाला.*

***निष्कर्ष :***

*प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासाद्वारे खालील निष्कर्ष मांडता येतात-*

*१) लातूर हे प्राचीन काळातील मौर्य साम्राज्यापासून व्यापाराचे महत्वाचे केंद्र आहे.*

*२) लातूर राष्ट्रकुटांची पहिली राजधानी असल्यामुळे लातूर बाजारपेठेचा विकास झाला व राष्ट्रीय व्यापारात लातूरला महत्वाचे स्थान प्राप्त झाले.*

*३) तेर ते सन्नती आणि रोम या प्रमुख व्यापारी मार्गावर लातूर असल्यामुळे लातूरला व्यापारी जगतात प्राचीन काळापासून महत्व प्राप्त झाले.*

***संदर्भ ग्रंथ सूची :***

१) Indian Archaeology A Raview, Bahal, 1968, Page No. 124.

२) Latur District – Wikipedia.

३) *पाठक अ. शं. (संपादक), महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर लातूर जिल्हा भाग-१, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, इ.स. २००८, पृ. क्र. १.*

४) Latur District – Wikipedia.

५) *पाठक अ. शं. (संपादक), महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर लातूर जिल्हा भाग-१, पुर्वोक्त, पृ. क्र. ५७.*

६) *ठोसर हरिहर, तेरच्या प्राचीन इतिहासातील कांही अज्ञात दुवे – तेर गौरव ग्रंथ, इ.स. २००१.*

७) *डॉ. कठारे अनिल, मराठवाड्याचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, इ.स.२०१३, पृ. क्र. ६७.*

८) *कित्ता, पृ. क्र. ६८.*

९) *पाठक अ. शं. (संपादक), महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर लातूर जिल्हा भाग-१, पुर्वोक्त, पृ. क्र. ५९.*

१०) *डॉ. कठारे अनिल, डॉ. दळवे अरुण, राष्ट्रकुटांची राजधानी कंधार, कल्पना प्रकाशन, इ.स.२००५, पृ. क्र. १८.*

११) *डॉ. रमेश गंगथडे, प्राचीन मराठवाड्यातील नगरे आणि बाजारपेठा यांचा अभ्यास, पीएच. डी. प्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, दि. १७ जानेवारी २०१२.*